साप्ताहिक
भारत सरकार मान्यताप्राप्त

# अनंत विचार

संपादक : सचिन हरी आदापुरे    मो.नं.९८५००२७६४३

WEEKLY
ANANT VICHAR
वेब पोर्टल | युट्युब न्यूज नेटवर्क
Editor : SACHIN HARI ADAPURE
CELL NO - 9850027643
nageshadapure1978@gmail.com
अनंत विचार चा अंक WHATSAPP वर वाचण्यासाठी आपला WHATSAPP नंबर व नांव वरील नंबरवर SMS करावा

वर्ष : दुसरे | वार:मंगळवार | दि.१६ एप्रिल २०२४ | किंमत : ५ रुपये | पाने : ४ | अंक: ३७ | R.N.I.No.-MAH-MAR-2022/83591 | PPR/83/2023-2025

## माढ्यात शरद पवारांनी निर्णायक डाव टाकलाच

## धैर्यशील मोहिते पाटलांचा राष्ट्रवादीत प्रवेश.



अकलूज– गेल्या अनेक दिवसांपासून ज्याची चर्चा सर्वाधिक महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये सुरू होती, त्याला रविवारी पूर्णविराम मिळाला असून धैर्यशील मोहिते पाटील यांनी राष्ट्रवादी शरचंद्र पवार पक्षाम ध्ये प्रवेश केला आहे. त्यामुळे माढ्यातून रिंगणात असलेल्या भाजपचे रणजीतसिंह निंबाळकर यांच्या विरोधात धैर्यशील मोहिते पाटील यांच्या उमेदवारीवरही शिक्कामोर्तब झालं आहे. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत धैर्यशील म ोहिते पाटील यांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षामध्ये प्रवेश केला.

धैर्यशील मोहिते पाटील १६ एप्रिल रोजी उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. त्यामुळे माढ्यात भाजपचे रणजितसिंह निंबाळकर यांच्यासमोर तगडे आव्हान निर्माण झालं आहे. रणजिसिंह निंबाळकर यांच्या उमेदवारीला सातार्‍यातून निंबाळकर आणि सोलापुरातून मोहिते पाटलांनी कडाडून विरोध केला आहे.

गेल्या काही दिवसांपासून धैर्यशील पाटील हे तुतारी हातामध्ये घेणार अशी चर्चा रंगली होती. कार्यकर्त्यांकडून सुद्धा दबाव सुरू होता. या सर्व पार्श्वभूमीवर म ोहिते पाटील यांनी राष्ट्रवादी शरचंद्र पवार पक्षामध्ये प्रवेश केला आहे. विजयसिंह मोहिते पाटील हे सुद्धा धैर्यशील मोहिते पाटील यांच्या पाठीशी राहणार आहेत. संजीवराजे निंबाळकर आणि रामराजे निंबाळकर सुद्धा शरद पवार गटाला साथ देणार आहेत. त्यामुळे माढ्यामध्ये राजकीय चित्र पूर्णतः पालटून गेलं आहे. शिंदे गटाचे माजी आमदार नारायण आबा पाटील सुद्धा धैर्यशील मोहिते पाटील यांना साथ देणार आहेत. ते सुद्धा शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करणार आहेत.

धैर्यशील मोहिते पाटील यांनी पक्ष प्रवेश करण्यापूर्वी शरद पवार यांनी विजयसिंह म ोहिते पाटील यांची निवासस्थानी पोहोचले. अकलूजमध्ये त्यांच्या निवासस्थानी पोहोचले. यावेळी माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे सुद्धा पोहोचले. त्यामुळे तिन्ही नेते तब्बल दोन दशकांनी एकत्र आले. विजयसिंह मोहिते पाटलांच्या शरद पवार थेट घरी पोहोचल्याने माढा व सोलापूर या दोन्ही लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीत समन्वय आणखी वाढणार आहे. सुरुवातीपासून जयसिंह म ोहिते पाटील यांनी मोहिते पाटील हे शरद पवारांकडे गेल्याने माढा आणि सोलापूर या दोन्ही जागा भाजप गमावणार असल्याचा दावा केला होता. डिनर डिप्लोमसीसाठी सुशीलकुमार शिंदे सुद्धा पोहोचल्याने सोलापूर लोकसभा जागेवर प्रणिती शिंदे यांना फायदा मिळणार आहे.

## पहिल्याच दिवशी सोलापूरमध्ये ५८, तर माढ्यासाठी ६४ अर्जांची विक्री

**सोलापूर** – सोलापूर आणि माढा लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यास आजपासून सुरुवात झाली आहे. माढा लोकसभा मतदारसंघासाठी पहिल्याच दिवशी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, धैर्यशील मोहिते पाटील यांच्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नावाने अर्ज नेण्यात आले आहेत. तसेच, भाजपच्या नावाने रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्यासाठी, तर वंचितचे रमेश बारसकर यांनीही अर्ज नेला आहे. त्याम ुळे माढ्यात पहिल्याच दिवशी ३९ जणांकडून ६४ अर्ज खरेदी करण्यात आले आहेत.

सोलापूर लोकसभा मतदारसंघासाठी पहिल्याच दिवशी एक अर्ज दाखल झाला असून ३८ इच्छुकांनी ५८ अर्ज नेले आहेत. पहिल्याच दिवशी सोलापूर लोकसभा म तदारसंघासाठी दीपक ऊर्फ श्री व्यंकटेश्वरा महास्वामी यांचा उमेदवारी अर्ज दाखल झाला आहे. त्यांनी भाजपच्या नावाने अर्ज भरला आहे, तसेच, उमेदवारी अर्ज नेलेल्यांमध्ये माजी नगरसेविका श्रीदेवी जॉन फुलारी यांचा समावेश आहे. सोलापूर लोकसभा मतदारसंघासाठी पहिल्याच दिवशी ३८ इच्छुकांनी ५८ अर्ज नेले आहेत. जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून ही माहिती देण्यात आली. माढा मतदारसंघासाठी ३९ जणांनी ६४ अर्ज नेले आहेत. त्यात ड नितीन जयसिंगराव खराडे यांनी ४ अर्जराष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षासाठी नावाने धैर्यशील मोहिते–पाटील यांच्या नावाने, तर गणेश सिध्देश्वर भिंगे यांनी २ अर्ज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षासाठी विजयसिंह मोहिते पाटील यांच्या नावाने अर्ज नेले आहेत. सतीश शिवाजी जंगम यांनी ४ अर्ज भारतीय जनता पार्टीसाठी खासदार रणजितसिंह नाईक–निंबाळकर यांच्या नावावर नेले आहेत. वंचित बहुजन आघाडीचे माढ्याचे उमेदवार रमेश नागनाथ बारसकर यांनी स्वतःसाठी ३ अर्ज नेले आहेत, त्याम ुळे पहिल्याच दिवशी भाजप, राष्ट्रवादी आणि वंचितच्या उमेदवारांसाठी अर्ज नेण्यात आले आहेत., सोलापूर लोकसभा मतदारसंघात भाजपकडून माळशिरसचे आमदार राम सातपुते, तर काँग्रेसकडून आमदार प्रणिती शिंदे या निवडणूक लढवत आहेत. याशिवाय वंचित बहुजन आघाडीचे राहुल गायकवाड हेही नशिब अजमवत आहेत. तसेच, एम आयएमचा उमेदवारही घोषित होणार आहे. त्यामुळे सोलापुरात चौरंगी लढत होणार आहे. माढा लोकसभा मतदारसंघात भाजपकडून खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना, वंचित बहुजन आघाडीकडून रमेश बारसकर यांना उमेदवारी घोषित झाली आहे, तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून धैर्यशील मोहिते पाटील यांची उम ेदवारी निश्चित आहे, त्यामुळे माढ्यात तिरंगी लढत होणार हे निश्चित आहे.

## मंगळवेढा पोलिसांनी १ लाख ४३ हजार ८८० रुपयांची अवैध वाहतूक होणारी दारू पकडली

मंगळवेढा – लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रत्नागिरी– नागपूर राष्ट्रीय महामार्गावर चाळीस धोंडा येथे पोलिसांच्या तपासणी नाक्यावर मंगळवेढा पोलिसांचे पथक तपासणी करीत असताना १ लाख ४३ हजार ८८० रुपयांच्या बेकायदेशीर दारूची वाहतूक करून कर्तव्यावर असलेले पोलीस उपनिरीक्षक सलिम शेख यांना धक्काबुक्की करून शासकिय कामात अडथळा आणल्या प्रकरणी आरोपी प्रकाश चुडाप्पा शिंदे,शरद मारुती मस्के, स्वप्निल शरद मस्के (रा. सांगोला) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे.

फिर्याद पो.हे.कॉ. सैफुल अब्दुल रसिद अन्सारी यांनी दिली आरोपी नामे प्रकाश चुडाप्पा शिंदे यांने आपले ताब्यातील बोलेरो क्रमांक एम.एच.४५ ए.एल.८४१७ हा गाडीत वेगवेगळ्या प्रकारच्या इंग्लिश दारूच्या १,४३,८८० रुपयाच्या बाटल्याचे बॉक्स विनापरवाना अवैधरित्या गाडीतुन घेवून जात असताना पोसई शेख यांनी सांगोला शहरातील धनगर गल्ली येथे सांगोला पोलीस व मंगळवेढा पोलीस यांच्या पथकाने पकडले. या घटनेचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अंकुश वाघमोडे करीत आहेत.

## तुंगत येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीदिनी तणाव

पंढरपूर – देशभरात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जयंती उत्सव मोठ्या उत्साही वातावरणात साजरा केली जात असताना तालुक्यातील तुंगत ग्रामपंचायत प्रशासनाच्यावतीने आयोजित जयंती कार्यक्रमास सरपंच डॉ.अमृता रणदिवे या अनुपस्थित राहिल्याने भीमसैनिकांमधून संताप व्यक्त करण्यात आला. यामुळे ग्रामपंचायत कार्यालयात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

राजकीय दृष्ट्या अतिशय संवेदनशील असलेल्या तुंगत येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्यावतीने १४ एप्रिल रोजी ग्रामपंचायत कार्यालय येथे कार्यक्रम घेण्यात आला होता. यानिमित्ताने सरपंच डॉ.अमृता रणदिवे यांच्या हस्ते जयंती कार्यक्रम होणे अपेक्षित असताना त्या कार्यक्रमास गैरहजर होत्या. दरम्यान यावेळी भीमनगर परिसरातील भीम जयंती उत्सव समितीचे कार्यकर्ते तुंगत ग्राम पंचायत कार्यालयात आले असता सरपंच अनुपस्थित असल्याने त्यांनी रोष व्यक्त केला. यावेळी भीमसैनिकांनी जोरदार घोषणाबाजी करत ग्रामपंचायत प्रशासनाच्या कारभाराचा निषेध केला. मागील वेळी संविधानदिनीसुद्धा सरपंच उपस्थित राहिल्या नसल्याचा आरोप त्यांनी करीत त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली. जोपर्यंत सरपंच डॉ.रणदिवे यांच्यावर कारवाई केली जाणार नाही तोपर्यंत आम्ही हटणार नाही व जयंती साजरी करू दिली जाणार नाही असा पवित्रा या ठिकाणी कार्यकर्त्यांनी घेतल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर ग्रामसेवक पाटील, उपसरपंच प्रकाश रणदिवे, सदस्य बतासराव वनसाळे, नवनाथ रणदिवे, अंगद रणदिवे यांनी सामोपचाराने निर्णय घेऊन जयंती उत्सव पार पाडला व भविष्यात महापुरुषांच्या जयंती अथवा पुण्यतिथी कार्यक्रमास लोकप्रतिनिधींची अनुपस्थिती आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करण्याचा ठराव आम्ही ग्रामपंचायतमध्ये घेऊ असे आश्वासन दिल्यानंतर येथील वातावरण निवळले व जयंती उत्सव पार पडला.

## चैत्री यात्रेनिमित्त पंढरपुरातील वाहतूक मार्गात बदल

**पंढरपूर** – येत्या १९ एप्रिल पासून होणाऱ्या चैत्री यात्रेनिमित्त पंढरपूर शहरातील तसेच शहरा बाहेरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतूक मार्गात बदल करण्यात आला आहे. हा बदल १७ ते २४ एप्रिल २०२४ या कालावधीपर्यंत राहणार आहे. पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत.

पंढरपूर शहरात प्रवेश करणाऱ्या वाहनांना सूचना:– पंढरपूरात यात्रे निमि त्त नगर, बार्शी, सोलापूर, मोहोळकडून येणारी वाहने करकंब क्रॉस रोड , (अहिल्यादेवी चौक) शेटफळ चौक मार्ग विसावा येथे पार्क करावीत. ६५ एकर येथे फक्त दिंडी व पालखीचे वाहने पार्क करावीत. पुणे,सातारा,वाखरी,मार्गे येणारी वाहने इसबावी विसावा येथे पार्क करावीत. कराड, आटपाडी, दिघंची मार्गे येणारी वाहने वेअर हाऊस येथे पार्क करावीत. कोल्हापूर, सांगली, मिरज, सांगोला मार्गे येणारी वाहने कासेगांव फाटा, टाकळी बायपास मार्गे येवून वेअर हाउस येथे पार्क करावीत. तसेच विजापूर, मंगळवेढा मार्गे येणारी वाहने टाकळी बायपासमार्गे वेअर हाऊस व यमाई तुकाई मंदीर येथे पार्क करावीत.

पंढरपूर शहरातून बाहेर जाणाऱ्या वाहनांबाबत सूचना:– पंढरपूर शहरातून टेंभुर्णी,नगर,सोलापूर,लातूरकडे जाणाऱ्या सर्व वाहने सावरकर चौक, नवीन कराड नाका,कॉलेज क्रॉस रोड,करकंब चौक मार्गे जातील. पुणे–सातार्‍याकडे जाणारी वाहने सरगम चौक, कॉलेज क्रॉस रोड वाखरी मार्गे जातील तर विजापूर,कराड,आटपा डी,कोल्हापूर,सांगली,मिरज,मंगळवेढा मार्गे जाणा–या सर्व गाड्या सावरकर चौक, नवीन कराड नाका येथून टाकळी बायपास व गादेगाव फाटा मार्गे जातील.

पंढरपूर शहरातीलअंतर्गत वाहतुकीबाबत १७ ते २० एप्रिल २०२४ पर्यंत प्रदक्षिणा मार्ग ,महाव्दार चौक ते शिवाजी चौक,सावरकर चौक ते शिवाजी चौक मार्ग सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद असेल. बार्शी, सोलापूर मार्गावरुन येणारी तीन रस्तामार्गे येणारी हलकी वाहने फक्त अंबाबाई पटांगणात उतरतील. नियमित ट्रक व यात्रेसाठी सोडण्यात येणाऱ्या एस.टी. बसेसना जुना दगडी पुल, नवीन पुल व तीन रस्ता मार्ग बंद ठेवण्यात येणार आहे. त्याचबरोबर मंगळवेढा नाका, महात्मा फुले चौक , लहुजी वस्ताद चौक या मार्गाने येणाऱ्या सर्व वाहनांना प्रवेश बंदी आहे. अंबाबाई पटांगण ते भजनदास चौक, अंबाबाई पटांगण ते अर्बन बँक, शिवाजी चौक ते अर्बन बँक, संकुल कार्नर ते नगरपालिका भक्ती मार्ग ते काळा मारुती चौक हा मार्ग पासेसच्या वाहना व्यतिरिक्त इतर सर्व प्रकारच्या वाहनासांठी बंद ठेवण्यात येणार आहे.

पार्किंग व्यवस्था सूचना:– अहम दनगर,बार्शी,सोलापूर,मोहोळकडून येणारी वाहने आहिल्या चौक, तीन रस्ता मार्गे मोहोळ रोड विसावा व नगरपालिकेच्या वाहनतळावर पार्किंग करतील. तसेच ६५ एकर येथे दिंडी व पालखीची वाहने पार्कींग करतील. पुणे,सातारा,वाखरी,मार्गे येणारी वाहने इसबावी विसावा येथे पार्क करावीत. कराड, आटपाडी, दिघंची मार्गे येणारी वाहने वेअर हाऊस येथे पार्क करावीत. कोल्हापूर,सांगली,मिरज,सांगोला मार्गे येणारी वाहने कासेगांव फाटा, टाकळी म ार्गे येवून वेअर हाउस येथे पार्क करावीत. विजापूर, मंगळवेढाकडून येणारी वाहने कासेगाव फाटा, टाकळी मार्गे वेअर हाऊस येथे पार्कींग करावीत. यात्रा कालावधीत शहरात येणारी हलकी वाहने अंबाबाई पटांगण, गजानन महाराज मठ, नगरपालिका पार्कींग, क्रीडा संकुल तसेच संबधीत मठामध्ये पार्क होतील शहरातील अंतर्गत रोडवर कोणत्याही ठिकाणी गाड्या पार्क करण्यास मनाई असेल.

एकेरी मार्ग – कॉलेज क्रॉस रोड ते सरगम चौक ते सावरकर चौक ते नवीन कराड नाका यामार्गावर एकेरी वाहतुक राहील.

संबधित भाविकांनी व वाहनधारकांनी या बदलेल्या वाहतूक मार्गाची नोंद घेऊन वाहतूक कोंडी निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आवाहन श्री. सरदेशपांडे यांनी केले आहे.

# संपादकीय

## चीनचा खोडसाळपणा

भारताचा शेजारी असणारा पण भारताला कायम पाण्यात पाहणारा चीन सतत काही ना काही खोड्या काढून दोन्ही देशातील तणाव कायम वाढवत असतो. हे आताच नाही तर १९६२ पासून चालू आहे. १९६२ साली भारताशी मैत्रीचा हात पुढे करून हिंदी चिनी भाई भाई म्हणत त्याने भारताचा केसाने गळा कापला. त्यानंतरही त्याने भारताच्या सतत खोड्या काढून भारताला त्रास दिला. कधी त्याने भारतात घुसखोरी केली तर कधी त्याने सीमेवर नवीन गावे वसवली तर कधी भारतातील गावांना चिनी नावे देऊन ती गावे चीनच्या हद्दीत असल्याचा दावा केला अर्थात चीनच्या या दाव्याला किंवा खोडसाळपणाला भारताने कधी भीक घातली नाही. सप्टेंबर महिन्यात चीनने भारतातील लडाख आणि अरुणाचल प्रदेशातील काही गावांना चीनच्या नकाशात दाखवले होते. जी २० शिखर संमेलनात चीनने त्यांचा नवीन नकाशा जाहीर केला होता. हा नवीन नकाशा इंटरनेटवर प्रसिद्ध झाला होता या नकाशात त्याने भारतातील लडाख आणि अरुणाचल प्रदेशातील काही गावांना चीनमध्ये दाखवले होते इतकेच नाही तर त्या गावांना चिनी नावे देखील दिली होती. चीनच्या या खोडसाळपणाची भारताने तातडीने दखल घेऊन त्याचा निषेध केला होता. अर्थात निषेध केल्यानंतर चीनने आपला खोडसाळपणा बंद केला नाही तो अजूनही चालूच आहे. आताही चीनने भारताची अशीच नवी खोडी काढली आहे. चीनने अरुणाचल प्रदेशातील वेगवेगळ्या तीस स्थळांना चिनी भाषेत नवी नावे दिली आहेत. चीनने अरुणाचल प्रदेशला झांगनान असे नाव दिले आहे. तो दक्षिण तिबेट चा भाग असल्याचा दावा चीनने केला आहे. सतत काही ना खोड्या काढून भारताशी पंगा घेण्याची चीनची जुनी खोड आहे अर्थात अशी खोड तो फक्त भारताचीच काढतो असे नाही तर इतर देशांचीही काढतो. भारत चीनच्या या खोड्यांना भीक घालत नाही हे वेगळे सांगायला नको उलट ज्या ज्या वेळी चीनने भारताच्या खोड्या काढल्या आहेत त्या त्या वेळी भारताने चीनचा जाहीर निषेध करून त्याची तक्रार अंतरराष्ट्रीय समुदायाकडे केली आहे. भारत चीनच्या खोडसाळपणाला जशास तसे उत्तर देत आला तरी आशिया खंडातील इतर देश मात्र चीनच्या या खोड्या मुकाट सहन करत असतात कारण आशिया खंडातील विशेषतः भारताच्या शेजारील काही देशांना त्याने वारेमाप कर्ज देऊन तर काही देशांना धाक दाखवून गप्प बसवले आहे. भारत मात्र त्याच्या या खेळीला बळी पडत नाही म्हणूनच तो अशा खोड्या अधून मधून काढत असतो. भारताच्या अरुणाचल प्रदेश आणि लडाखवर चीनचा डोळा आहे इतकेच नाही तर अरुणाचल प्रदेश हा आपलाच भूभाग असल्याचा दावा चीनने अनेकदा केला आहे. काही महिन्यांपूर्वी चीनच्या झाऊझंग येथे पार पडलेल्या क्रीडा स्पर्धेत भारताने खेळण्यास नकार दिला त्यावेळी चीनने अरुणाचल प्रदेशातील खेळाडूंना स्टेपल व्हिसा दिला होता. स्टेपल व्हिसा देऊन त्यांनी एकप्रकारे भारताला डिवचले होते. त्या आधी लडाखमध्ये चिनी सैन्य घुसवले होते तेंव्हा दोन्ही देशातील सैन्य एकमेकांपुढे उभे ठाकले होते केंव्हाही युद्धास तोंड फुटेल अशी परिस्थिती निर्माण झाली होती. यावेळी झालेल्या धुमश्चक्री नंतर चिनी सैन्य भारताच्या हद्दीतून निघून गेले होते. मात्र सीमेवर त्यांच्या हालचाली कायम चालू असतात. मुळात चीन हा जगातला सर्वात कपटी देश आहे. चीनला जगातील महासत्ता व्हायचं आहे त्यासाठी त्याने विस्तारवादी भूमिका स्वीकारली आहे त्यामुळेच तो शेजारील देशांची जमीन आणि मालमत्ता बळकावीत आहे. त्यांच्या या विस्तारवादी धोरणाला जर कोणी आडकाठी आणणार असेल तर तो भारत आहे हे चीन जाणून आहे म्हणूनच तो भारताच्या अशा अधूनमधून खोड्या काढून भारताला त्रास देत असतो अर्थात त्याच्या या खोड्यांना भारत आता बधणार नाही कारण आजचा भारत हा १९६२ चा भारत नसून २०२३ चा भारत आहे. चीनच्या आरे ला कारे करण्याची हिंमत या भारतात आहे त्यामुळेच भारताशी थेट पंगा न घेता अशा छोट्या मोठ्या खोड्या काढून भारताला त्रास देण्याचे धोरण चीनने स्वीकारले आहे.

# पक्षांच्या पाण्यासाठी भावंडांकडून भांडी वाटप



पंढरपूर – पर्यावरणाचे काम करणारे वरद बडवे व सृष्टी बडवे या दोघा भावंडांनी तीव्र उन्हाळा लक्षात घेऊन पक्षांना पिण्याचे पाणी मिळावे यासाठी मातीच्या भांड्याचे वाटप केले. तसेच पर्यावरण जागृतीचे फलक देखील लावले आहेत.

पंधरा वर्षाचा वरद व अवघी बारा वर्षाची सृष्टी या भावंडांना लहान वयापासून पर्यावरणाची ओढ आहे. या पृथ्वीचा समतोल वृक्ष, पाणी, प्राणी यावरून अवलंबून असल्याची जाण त्यांना असल्यामुळेच दरवर्षी हे बहिण भाऊ विविध उपक्रमाव्दारे पर्यावरण बचावासाठी उपक्रम राबवित असतात. यातूनच त्यांना पक्षांना पिण्याचे पाणी मिळावे म्हणून मातीचे भांडे वाटप करण्याचा उपक्रम राबविला. आपलल्या घरा नजिक दोन तीन चिमण्या मरून पडल्याचे पाहून त्यांनी हा निर्णय घेतला. पंढरपूर शहर पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके व वारकरी पाईक संघाचे रामकृष्ण वीर महाराज यांच्या हस्ते सदर उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी घोडके यांनी, लहान वयापासून या दोघांना पर्यावरणाची समज असल्याचे पाहून कौतुक केले. तसेच शहर पोलीस ठाणे येथे पक्षांना पाणी पिण्यासाठी मातीचे भांडे ठेवण्याचे आश्वासन ही दिले.

यावेळी पंढरपूर अर्बन बँकेच माजी अध्यक्ष रा.पां.कटेकर व मान्यवर उपस्थित होते.

# शिवसेना शिंदे गट पंढरपूर उपशहर प्रमुख मयूर नाईक पवार



**पंढरपूर –** श्री. मयूर नाईक पवार क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असून तरुण कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख आहे. शिवसेना पंढरपूर उपशहर प्रमुखपदी मयूर नाईक पवार यांची निवड सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख शिवाजीराव सावंत सर व जिल्हा प्रमुख अमोल बापू शिंदे व पंढरपूर शिवसेना शहर प्रमुख विश्वजीत मुन्ना भोसले यांच्या उपस्थितीत निवड करण्यात आली. पंढरपुरात झालेल्या बैठकीत याबाबतची घोषणा करण्यात आल्या. यावेळी सांगोला मतदार संघातील लोकप्रिय आमदार शहाजी बापू पाटील, तसेच शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख शिवाजी सावंत, विठ्ठल सहकारी साखर कारखाना संचालक धनंजय काळे, तसेच प्रथमेश जाधव, गौरव सोनार, ओंकार सोनार, प्रणव भेन्की, सुशांत आसबे, पै.आदेश जगताप, शहर संघटक अनिरुद्ध सुरवसे, विशालभाऊ शिंदे, ओंकार नाईकपवार यांच्यासह अन्य कार्यकर्ते मोठ्या बहु संख्येने उपस्थित होते.


## तणाव आला तर स्वतःला भेटवस्तू द्या

### सरश्री



जीवनात बऱ्याच घटना अशा घडतात, ज्या मनात ठाण मांडून बसतात. मन सहजासहजी त्यांना सोडायला तयार होत नाही.

भूतकाळातील घटना मनात साठवून पुनःपुन्हा त्याच घटनांची तीच दृश्यं पाहतो, त्याच भावना अनुभवतो. तशाच वेदना, दुःख, त्रास सहन करून स्वतःचा तणाव वाढवत राहतो.

दिवसभर असे प्रोग्राम आपल्या मनात सुरू राहतात. समजा लोक मेसेज पाठवण्यासाठी गि.फ. (जी आय एफ) चा वापर करतात. काही चित्रांच्या माध्यमातून ते त्यांचा संदेश तुमच्यापर्यंत पोहोचवत राहतात.

त्याचप्रमाणे तुमच्या नकारात्मक भावना आणि विचार दिवसभर चित्र किंवा दृश्याच्या रूपात कळत नकळत तुमच्यासमोर येत राहतात, तणाव वाढवतात. मात्र आता या गि.फ.ला, दृश्यांना थांबवायचं आहे. त्यासाठी ताकदीची गरज नसून तंत्राच्या मदतीने सोडावे लागते. गि.फ. यात टेक्निकला टी जोडून ते गिफ्ट बनवायचं आहे.

तुम्ही जेव्हा कधी तणावात असता तेव्हा या टेक्निकचा उपयोग करून तुमचे इमोशन्स, विचार आणि नकारात्मक भावनांना रिलिज करा. मात्र त्यानंतरही तुम्हाला जो काही आनंद आणि मुक्तपणाची भावना जाणवेल, ती एक भेट म्हणून समजा. भूतकाळातील घटना आठवून तणावग्रस्त होण्यापेक्षा त्यांच्याकडे दुर्लक्ष करून वर्तमान क्षणाचा आनंद घ्यायला.

तेजज्ञान फाउंडेशन
9921008060
helpdesk@tejgyan.org


# विठ्ठलराव शिंदे कारखान्याचे हंगाम अखेर ऊस बिल अदा

टेंभुर्णी – विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याने ऊस गाळप हंगाम २०२३-२४ मध्ये युनिट नं.१ पिंपळनेर व युनिट नं.२ करकंब येथे यशस्वी गाळप करून या हंगामात दोन्ही युनिट कडे हंगामअखेर पर्यंत गाळपास आलेल्या ऊसास अनुदानासह संपूर्ण ऊस बिलाचे पेमेंट व ऊस तोडणी वाहतूक वेळेत अदा केलेली असून हंगाम अखेर ऊस बिल अदा करणारा विठ्ठलराव शिंदे कारखाना राज्यातील एकमेव कारखाना ठरला असल्याची माहीती संस्थापक चेअरमन आ.बबनराव शिंदे यांनी दिली.

अधिक माहीती देताना आ.शिंदे म्हणाले की, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे युनिट नं.१ पिंपळनेर व युनिट नं.२ करकंब या कारखान्याचे सन २०२३-२४ गळीत हंगामाची सांगता झालेली असून कारखान्याने दोन्ही कारखान्याचे कार्यक्षेत्रातील माढा, पंढरपूर व माळशिरस तालुक्यातील सभासद, ऊस पुरवठादार शेतकरी यांचे संपूर्ण ऊसाचे गाळप केलेले आहे. सन २०२३-२४ गळीत हंगामामध्ये युनिट नं.१ कडे १८ लाख ९२ हजार ९४९ मे.टन ऊसाचे गाळप होवून ११ टक्के साखर उता-याने १९ लाख २८ हजार ८५० क्विंटल साखर पोती उत्पादीत झाली आहेत. तसेच युनिट नं.२ कडे ६ लाख २५ हजार ८८८ मे.टन ऊसाचे गाळप होवून ११.१४ टक्के साखर उता-याने ६ लाख ६३ हजार ९०० क्विंटल साखर पोत्याचे उत्पादन झालेले आहे. दोन्ही युनिट चे मिळून २५ लाख १८ हजार ८३७ मे.टन गाळप होवून २५ लाख ९२ हजार ७५० क्विंटल साखर पोत्याचे उत्पादन झाले आहे. दोन्ही युनिटचे मिळून १० कोटी ४१ लाख ८१ हजार १९५ युनिट वीज विक्री करण्यात आलेली आहे. या हंगामामध्ये युनिट नं.१ चे डिस्टीलरी विभागाकडे शुगर सिरप पासून ९५ लाख ८४ हजार ०७६ ब.लि., बी हेवी १ कोटी २५ लाख ९३ हजार २५१ ब.लि. व सी हेवी ८४ लाख ०२ हजार ७४० ब.लि. इथेनॉल उत्पादन असे एकूण ३ कोटी ०५ लाख ७९ हजार ९६७ ब.लि.इथेनॉल उत्पादन झालेले आहे. तसेच उत्पादीत इथेनॉल ऑईल कंपन्यांना सी हेवी-६८ लाख ०६ हजार, बी हेवी-४२ लाख ९३ हजार व शुगर सिरप-९५ लाख ८२ हजार असे एकूण एकूण २ कोटी ०६ लाख ८१ हजार पुरवठा करण्यात आलेले आहे.


हे पत्र मुद्रक सोमनाथ नवनाथ शिंदे यांनी प्रकाशक सचिन हरी आदापुरे व मालक सचिन हरी आदापुरे यांचे करीता दर्लिंग ग्राफिक्स, जुना बस स्टँड शेजारी, दर्शन उद्योग भवन, पंढरपूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर येथे छापून घर नं.१२२५, नाथ चौक, पंढरपूर, जि.सोलापूर येथून प्रकाशित केले. संपादक : सचिन हरी आदापुरे, घर नं.१२२५, नाथ चौक, पंढरपूर, जि.सोलापूर मो.नं.९८५००२७६४३ (या अंकात प्रसिध्द झालेल्या मजकुरांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्ष-पंढरपूर)

printed by SOMNATH NAVNATH SHINDE and published by SACHIN HARI ADAPURE and on behalf of SACHIN HARI ADAPURE printed at DARLING GRAPHICS, near old bus stand, darshan udyog bhavan , pandharpur, Dist - Solapur and published by Nath chouk pandharpur Editor : Sachin Hari Adapure, House No 1225, Nath chouk, Pandharpur Mob.9850027643








# श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या ४२ व्या गळीत हंगामाची सांगता

## विठ्ठल कारखान्याच्या सांगता समारंभात शिरली माढ्यांची डाळ, विठ्ठल कारखान्याचे यशस्वी १०,८१,०११ मे.टन गाळप पूर्ण


**पंढरपूर** – श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचा सन २०२३–२४ चा ४२ व्या गळीत हंगामात यशस्वी गाळप करून गळीत हंगामाचा सांगता समारंभ ह.भ.प.श्री रमेश महाराज वसेकर श्री संत सावता म हाराज यांचे १६ वे वंशज श्रीक्षेत्र अरण व ह.भ.प.श्री देवव्रत (राणा) महाराज वासकर, पारंपारिक फडाचे जेष्ठ अधिकारी श्रीक्षेत्र पंढरपूर, श्री शिवतेजबाबा मोहिते–पाटील, श्री दादासाहेब साठे, श्री संजय कोकाटे, श्री शिवाजी कांबळे कारखान्याचे चेअरमन श्री अभिजीतआबा पाटील व सर्व संचालक मंडळाचे यांचे प्रमुख उपस्थितीत व कारखान्याचे संचालक श्री बाळासाहेब चिंतामणी हाके व त्यांचे सुर्विद्य पत्नी सौ. सुवर्णा बाळासाहेब हाके या उभयतांचे शुभहस्ते श्री सत्यनारायण महापुजेने बुधवार दिनांक १० मार्च रोजी संपन्न झाला

गळीत हंगाम शुभारंभ प्रसंगी सभासद व ऊस पुरवठादार शेतकरी य तोडणी वाहतुक ठेकेदार यांना आवाहन करणेत आले होते की, जे जास्तीत जास्त ऊस पुरवठा करतील त्यांचा सन्मान करणेत येईल. त्यानुसार या गळीत हंगाम सांगता समारंभ प्रसंगी कारखान्यास या गळीत हंगामात सर्वात जास्त ऊस पुरवठा केलेले श्री सदाशिव यशवंत गाजरे रा.शेळवे, श्री सुनिल ज्ञानेश्वर मोरे रा. पटवर्धन कुरोली, श्री सुरेश मुरलीधर घाडगे रा. देगांव या तीन सभारादांचा सत्कार करण्यात आला. तसेच ऊस वाहतूक करणारे ठेकेदार श्री नितीन रघुनाथ शिंदे, श्री विष्णू भाऊसाहेब रुपनर, श्री नागनाय ज्ञानोबा जाधव, अनिल उत्तम चव्हाण यांचा व एकरी १०० मे. टन उत्तारा मिळालेले शेतकरी श्री रामचंद्र गोवर्धन देठे, हरीदास दशरथ कौलगे, अशोक एकनाथ भोसले या शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. गळीत हंगाम यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल कारखान्याचे खातेप्रमुख यांचे अभिनंदन करून सन्मान करणेत आला.

यावेळी कारखान्याचे चेअरमन श्री अभिजीतआबा पाटील म्हणाले की, पंढरपूर तालुक्याचा वैभव व आर्थिक कणा असलेला श्री विठ्ठल कारखाना हा बंद अवस्थेत होता, या कारखान्याच्या आर्थिक व तांत्रिक परिस्थितीवर म ात करून यशस्वीरित्या चालु करून दाखविला व सन २०२२–२०२३ गळीत हंगामामध्ये ७,२६,०१४ मे.टन ऊसाचे गाळप केले व सन २०२३–२४ गळीत हंगामामध्ये कमी कालावधीत यशस्वी गाळप करन १०,८१,०११ मे.टन ऊसाचे गाळप करून १०.३८ टक्के साखर उताराने १०,८५,०२५ क्विंटल साखर उत्पादन केले आहे. पुढील सिद्धानमध्ये जास्तीत जास्त गाळप करणेसाठी सर्वांनी असेच सहकार्य करावे, असे आवाहन केले.

या कार्यक्रमासाठी कारखान्याचे व्हाईस चेअरमन सौ. प्रेमलता रोंगे, संचालक सर्वश्री संभाजी भोसले, कालिदास पाटील, दिनकर चव्हाण, सुरेश भुसे, धनंजय काळे, साहेबराव नागणे, कालिदास साळुंखे, जनक भोराले, सचिन वाघाटे, प्रविण कोळेकर, नवनाथ नाईकनवरे, दत्तात्रय नरसाळे, सिताराम गवळी, अशोक जाधव, श्रीमती कलावती महादेव खटके, सौ सविता विठ्ठल रणदिवे, दशरथ जाधव, अशोक तोंडले, अंगद चिखलकर, अशोक घाडगे, तानाजी बागल, सचिन शिंदे–पाटील, समाधान गाजरे, धनाजी खरात, उमेश मोरे, गणेश ननवरे तसेच माजी संचालक धोंडीबा वाघमारे, राजाराम सावंत तसेच मधुकर नाईकनवरे, भारतनाना पाटील, भाऊसाहेब महाडिक, कल्याणराव पाटील, नितीन कापसे, बलभिम लोंढे, सुभाषदादा भोसले, संदिप मांडवे, शिवाजीभाऊ पाटील, प्रथमेश पाटील, रमेश चोपडे, ॲड. योगेश रणदिवे, दिगंबर फाळके, किरण घोडके कारखान्याचे सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग, कार्यकर्ते, सभासद, व्यापारी, ऊस तोडणी वाहतूक ठेकेदार, मजूर व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

## अभयसिंह जगताप अपक्ष निवडणूक लढविण्याचे संकेत



पंढरपूर – माढा लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून उमेदवारी मिळण्याचे संकेत मि ळाल्याने अभयसिंह जगताप यांनी गेल्या दोन महिन्यापासून मतदारसंघात बैठका घेऊन तयारी सुरू केली आहे. मात्र ऐनवेळी राष्ट्रवादी काँग्रेस धैर्यशील मोहिते–पाटील यांना उमेदवारी देणार असल्याने जगताप यांनी बंडाचे निशाण फडकविले असून ते अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

माढा लोकसभा मतदारसंघात भाजपने विद्यमान खा. रणजितसिंह नाईक–निंबाळकर यांना उमेदवारी दिली. यामुळे मोहिते–पाटील गट नाराज झाला. त्यांनी निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला होता. माढा लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने रासपचे संस्थापक अध्यक्ष महादेव जानकर यांना पाठिंबा दिला होता. मात्र ऐनवेळी भाजपने जानकर यांना आपल्या बाजूने वळवून घेतले. यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे

प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी अभयसिंह जगताप यांना उमेदवारी देण्याचे संकेत दिले होते. यामुळे अभयसिंह जगताप यांनी माढा मतदारसंघात पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्या बैठका घेऊन निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. मात्र ऐनवेळी खासदार शरद पवार यांनी धैर्यशील मोहिते –पाटील यांना राष्ट्रवादीम ध्ये प्रवेश देऊन उमेदवारी देण्याचे जाहीर केले. यामुळे जगताप नाराज झाले असून त्यांनी माढा लोकसभा मतदारसंघात बंडाचे निशान फडकावून अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल करून निवडणूक लढविणार असल्याचे जाहीर केले आहे. अखेर शरद पवार यांनी राजकीय खेळी करून भाजपम धील धैर्यशील मोहिते–पाटील यांना आपल्या गटाकडे वळवून उमेदवारी दिली आहे. यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

## सुस्तेत सरपंचपदाच्या निवडणुकीत घाडगे गटाचे विशाल कसबे विजयी



पंढरपूर – पंढरपूर तालुक्यातील सुस्ते ग्रामपंचायतीच्या सरपंच पदासाठी झालेल्या निवडणुकीत सत्ताधारी विठ्ठल भीमा परिवाराच्या दोन सदस्यांनी विरोधी पंढरपूर बाजार समितीचे माजी सभापती दिलीप घाडगे यांच्या गटाच्या उमेदवाराला मतदान केल्याने घाडगे गटाचे सरपंचपदाचे उमेदवार विशाल कसबे यांनी विठ्ठल भीमा परिवाराच्या नंदा वायदंडे यांचा एक मताने पराभव केला.विठ्ठल भीमा परिवाराचे दोन सदस्य फुटल्याने या ग्रामपंचायतीवर घाडगे गटाची पुन्हा सत्ता आली आहे. यामुळे विठ्ठल भीमा परिवाराला मोठा धक्का बसला आहे



## तारापूर येथील गंगाई सपाटे शिक्षण संकुलात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन.

**पंढरपूर** – पंढरपुर तालुक्यातील तारापूर येथील गंगाई सपाटे शिक्षण संकुलात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक महंमद शेख यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.या कार्यक्रमाचे आयोजन इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी वर्गशिक्षिका वैशाली सोनटक्के यांच्या मदतीने केले.

प्रशालेतील उपस्थित विद्यार्थ्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील विविध प्रसंगाविषयी माहिती दिली तर प्रशालेतील सहशिक्षक परमेश्वर ननवरे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर व त्यांनी केलेले कार्य त्यांनी लिहिलेले पुस्तके,वर्तमानपत्र याबाबत सविस्तर असे मार्गदर्शन करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. तर प्रशालेचे मुख्याध्यापक महंमद शेख यांनी बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजातील तळागाळातील लोकांसाठी केलेल्या कार्याविषयी माहिती देताना बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आचरणात आणून आपले जीवन आदर्शवत घडवता येईल अशा प्रकारचे विचार व्यक्त करून विद्यार्थ्यांना प्रेरित केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रेया नकाते प्रस्ताविक आर्या सपाटे तर आभार रेणुका सुतार हिने मानले. या कार्यक्रमास प्रशालेतील सर्व विद्यार्थी पालक शिक्षक उपस्थित होते.

## बहुजन हितकारिणी सभेकडून महात्मा फुले यांना अभिवादन

पंढरपूर – महात्मा जोतिराव फुले यांनी अस्पृश्यता, जातिव्यवस्थेचे निर्मूलन, स्त्रियांना व मागास जातीतील लोकांना शिक्षण दिले. स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ फ ुले दांपत्यानी १८४८ मध्ये पुणे भिडेवाडा येथे रोवली. देशात मुलींची पहिली शाळा फुलेंनी काढली. शोषित वर्गाच्या उत्थानाचे कार्य भारतात फुलेंनी कार्ल मार्क्सच्या आधी केले. बहुजन समाजाच्या अधोगतीचे मुळ अविद्येत असल्याचे फुलेंनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज व मोहम्मद पैगंबर यांच्यावर पोवाडे रचून धर्मनिरपेक्षतेचा संदेश फुलेंनी मानव जातीस दिला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी फुलेंना गुरु मानले व फुले भारतातील सामाजिक क्रांतीचे जनक असल्याचे सांगीतले. फुले जयंती देशभरात मोठ्या उत्साहात साजरी होते. त्याचाच एक भाग म्हणून महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त बहुजन हितकारिणी सभेच्या माध्यमातून अभिवादन करण्यात आले. रवी सर्वगोड, प्रदीप परकाळे, समाधान भोसले , किशोर कदम इत्यादी उपस्थित होते.




## विश्वभूषण महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

**पंढरपूर** – लायन्स क्लब पंढरपूर यांची अंध विकास संस्था संचलित शहीद मेजर कुणाल गोसावी निवासी अंधशाळा पंढरपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली सदरच्या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. दगडू कांबळे प्रतीक्षा एक्सप्रेस न्यूज चे संपादक व सोशल मीडिया संघटना खजिनदार –– महाराष्ट्र राज्य तसेच त्यांचे चिरंजीव प्रथमेश कांबळे हे उपस्थित होते प्रमुख मान्यवरांच्या असते प्रतिमेचे पूजन करण्यात आले प्रमुख पाहुण्यांचे स्वागत मुलांनी अगदी ढोल ताशाच्या गजरात केले.स्वागत गीत व भीम गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली

सदरच्या कार्यक्रमाप्रसंगी अंधशाळेतील विद्यार्थिनी कु. सुवर्णा गायकवाड हिने डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे दगडू कांबळे सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंधशाळेचे मुख्याध्यापक संतोष बारहाते सर यांनी केले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन – महेश म्हेत्रे सर यांनी केले तसेच प्रमुख पाहुण्यांचे आभार अंधशाळेचे विद्यार्थी यांनी मानले.

सदर कार्यक्रमाच्या निमित्ताने अंधशाळेतील सर्व विद्यार्थ्यांना अल्पोपहार अमोल अभंगराव यांनी दिले व मिष्ठांना भोजन देण्यात आले. सदरच्या कार्यक्रम ासाठी अंधशाळे तील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# संविधानाच नाही राहिले तर लोकशाही राहणार नाही - आमदार प्रणिती शिंदे

**सोलापूर** – काही विचारसरणीचे लोक आणि पक्ष आज संविधान बदलण्याचे भाष्य करत आहेत.मात्र संविधानाच नाही राहिले तर लोकशाही राहणार नाही. त्यामुळे आज डॉ. बाबासाहेबांना खरंच अभिवादन करायचं असेल तर आपल्या देशात संविधान बदलण्याचे जे षडयंत्र चालू आहे, त्याच्या विरोधात सगळ्यांनी एकत्र येणे गरजेचे आहे. कोणतीही भेदभाव, जात, धर्म जमात न पळता सगळ्यांनी एकत्र येऊन या शत्रूच्या विरोधात उभे राहण्याची गरज असल्याचे मत आमदार प्रणिती शिंदे यांनी व्यक्त केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त प्रयास मागासवर्गीय बहुद्देशिय संस्था सोलापूर यांच्या वतीने सोलापूर शहरातील बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे संविधान बचाव अभियानांतर्गत संविधानाच्या उद्देशिकेचे सामूदायिक वाचन करण्यात आले. यावेळी सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांनी उपस्थिती लावत संविधानाच्या उद्देशिकेच्या सामुदायिक वाचनामध्ये सहभाग नोंदवला.

यावेळी पुढे बोलताना प्रणिती शिंदे म्हणाल्या, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जो संघर्ष करत होते, तो हाच खरा संघर्ष असावा. हीच ती खरी चळवळ असून हीच आपल्या परीक्षेची वेळ आहे. कारण बाबासाहेबांनी दिलेले संविधान बदलण्याचे कोणी भाष्य करत असेल, त्याच्या विरोधात सगळ्यांनी उभे राहणे गरजेचे आहे, असे आमदार प्रणिती शिंदे यांनी यावेळी सांगितले.

संविधान बदलण्याची भाषा सत्ताधाऱ्यांकडून करण्यात येत असेल तर त्याचा आपण सर्वांनी निषेध करायला हवा. ही जी चळवळ आहे, हा संघर्ष आहे




तो आता सुरू होण्याची वेळ आहे. ठीक ठिकाणी संविधानाचे वाचन घेणे गरजेचे आहे. त्याबरोबरच शपथ घ्यायला पाहिजे की, आम्ही संविधान बदलू देणार नाही. उद्या संविधानाच नाही राहिले तर लोकशाही राहणार नाही आणि लोकशाही राहिली नाही तर हा देश विकृत मानसिकतेच्या लोकांच्या हातात जाईल, आणि देशच राहणार नाही त्यामुळे ही खरी परीक्षा आहे, असे मत प्रणिती शिंदे यांनी व्यक्त केले.

यावेळी आमदार प्रणिती शिंदे यांच्यासह काँग्रेस शहराध्यक्ष चेतन भाऊ नरोटे, सचिन शिंदे, प्रमिला तूपलवंडे, गणेश डोंगरे, बाबा करगोळे, सुशीला आंबुटे, मधुकर आठवले, नागनाथ कदम, भोजराज पवार, नरसिंह असोदे, अनिल मस्के, बसवराज म्हेत्रे, सुशील बंदपट्टे, राजन कामत, श्रीकांत दासरी, नागेश म्हेत्रे, लखन गायकवाड, तिरुपती परकीपंडला, परशुराम सतारेवाले, अंबादास गुत्तीकोंडा, सुहास जाधव, बालाजी जाधव, अनुपम शहा, सुभाष वाघमारे नागनाथ शहाणे, उमेश सुरते, संजय गायकवाड आदी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि भीमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिनदलित समाज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळेच समाजाच्या मुख्य प्रवाहात

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आमदार राम सातपुते यांनी केले अभिवादन

सोलापूर – उपेक्षित, दीनदलित समाजावर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मोठे उपकार आहेत. त्यांनी लिहिलेल्या संविधानामुळेच दीनदलित समाज समाजाच्या मुख्य प्रवाहात आहे, असे प्रतिपादन भाजपा आणि महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांनी केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त लोकसभा निवडणुकीतील भाजप व महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात अभिवादन केले. यावेळी माजी पालकमंत्री आ. विजयकुमार देशमुख, माजी सहकारमंत्री आ. सुभाष देशमुख , भाजपचे शहर अध्यक्ष नरेंद्र काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

आ. राम सातपुते म्हणाले, कोट्यावधी लोकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाच्या मुख्य प्रवाहात आणले. दीनदलितांना विकासाच्या मार्गावर आणण्यासाठी आजही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले संविधान मार्गदर्शक ठरत आहे. एका चहावाल्याचा मुलगा देशाचा पंतप्रधान होणे, माझ्यासारख्या एका ऊसतोड कामगाराचा मुलगा आमदार होणे आणि आता खासदारकीचा उमेदवार होणे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानामुळेच शक्य झाले आहे.

दरम्यान, भारतीय जनता पार्टी सोलापूर शहर जिल्हा कार्यालयातही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी माजी आमदार नरसिंग मेंगजी, माजी शहर अध्यक्ष रामचंद्र जन्नू, भाजपा प्रदेश विशेष



निमंत्रित सदस्य उदयशंकर पाटील, सरचिटणीस रोहिणी तडवळकर, विशाल गायकवाड, प्रा. नारायण बनसोडे, अनु. जाती अध्यक्ष मारेप्पा कंपली, माजी सभागृह नेते श्रीनिवास करली, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, महिला आघाडी अध्यक्षा विजया वड्डेपल्ली, इंदिरा कुडक्याल, माजी नगरसेविका संगीता जाधव, भाजपा शहर उपाध्यक्ष जय साळुंखे, श्रीनिवास करली, चिटणीस नागेश सरगम, बजरंग कुलकर्णी, सुनिल गौडगांव, भाजपा भटके विमुक्त विकास युवा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष अमोल गायकवाड, लक्ष्मण गायकवाड, बाशाभाई शेख, मंडल अध्यक्ष गिरीष बत्तुल, आनंद बिराजदार, अर्जुन जाधव, महेश देवकर, कोषाध्यक्ष चंद्रकांत तापडिया आदी उपस्थित होते.

# भाविकांच्या सुविधेसाठी आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना



**पंढरपूर** – चैत्री शुध्द एकादशी १९ एप्रिल रोजी असून, या चैत्री यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. या यात्रेत येणाऱ्या भाविकांची गैरसोय होणार नाही यासाठी प्रशासनाने व मंदीर समितीने आवश्यकती तयारी केली आहे. सध्या उन्हाळा सुरु असून, दिवसेंदिवस तापमानात वाढ होत आहे. यात्रेसाठी येणा-या भाविकांना उष्णतेचा त्रास होवू नये यासाठी भाविकांच्या आरोग्य सुरक्षितेला प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच भाविकांना आवश्यक सुविधा तात्काळ मिळाव्यात यासाठी पाच आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना करण्यात आली असून, हे कक्ष २४ तास कार्यरत राहणार असल्याची माहिती प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिली.

चैत्री यात्रा तयारीबाबत प्रांत कार्यालय येथे आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, तहसिलदार सचिन लंगुटे, नायब तहसिलदार मनोज श्रोत्री, पंढीत कोळी, उपमुख्याधिकारी सुनिल वाळुंजकर, मंदीर समितीचे व्यवस्थापक बालाजी पुदलवाड, तालुका आरोग्य अधिकारी अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, आरोग्य निरिक्षक शरद वाघमारे तसेच संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. चैत्री वारीत येणाऱ्या भाविकांना आवश्यक सोयी-सुविधा तात्काळ मिळाव्यात त्याचबरोबर आरोग्याच्या व स्वच्छतेच्या दृष्टीने कोणतेही गैरसोय येऊ नये यासाठी पत्राशेड, ६५ एकर, चंद्रभागा वाळवंट, विठ्ठल-रुक्मिणी मंदीर, नगरपालिका या पाच ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना केली आहे. आपत्ती व्यवस्थापन कक्षात नेमणूक केलेल्या अधिकारी व कर्मचारी यांनी आपली जबाबदारी चोखपणे पार पाडावी असे निर्देश प्रांताधिकारी इथापे यांनी दिले.

आरोग्य विभागामार्फत यासाठी पत्राशेड, ६५ एकर, चंद्रभागा वाळवंट, दर्शन मंडप, पोलीस संकुल येथे प्रथमोपचार केंद्र उभारण्यात येणार आहेत. तसेच या ठिकाणी मुबलक प्रमाणात औषधसाठा उपलब्ध करण्यात येणार आहे. सर्व सुविधायुक्त रुग्णवाहिका सज्ज ठेवण्यात येणार आहे. तसेच नगरपरिषद व मंदीर समितीकडून दर्शन रांग, पत्राशेड, चंद्रभागा वाळवंट, ६५ एकर व मंदीर परिसर येथे वेळोवेळी स्वच्छता करण्यात येणार आहे. भाविकांच्या सुविधेसाठी दिशा दर्शक फलक, पार्किंग व्यवस्था, स्वच्छता गृहे आदी सुविधेबाबतचे दिशादर्शक फलक लावण्यात येणार आहेत. मंदीर समिती कडून दर्शन रांगेत स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, मॅट, कुलर, विश्रांती कक्ष, लाईव्ह दर्शन, वैद्यकीय सुविधा उपलब्ध असणार आहेत. ६५ एकर परिसरात मुबलक प्रमाणात पाणी व्यवस्था, अखंडीत व सुरक्षित विद्युत पुरवठा, अगिनशमन व्यवस्थेसह फिरते आरोग्य पथकांची नेमणूक करण्यात आली आहे.नदीपात्रात स्वच्छता व पुरेसा प्रकाश राहिल याची दक्षता घेवून, शहरात वाहतुक व्यवस्था सुरळीत रहावी, वाहतुकीस कोणतेही अडचण येवू नये यासाठी शहराबाहेर मोकळया जागेवर वाहन पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच भाविकांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस प्रशासनाकडून आवश्यकतो बंदोबस्त तैनात करण्यात येणार असल्याचेही प्रांताधिकारी इथापे यांनी सांगितले.

# लिंगायत समाजाचा प्रणिती शिंदेंना जाहीर पाठिंबा

**सोलापूर** – सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांना लिंगायत समाजाने जाहीर पाठिंबा दिला आहे. वीरशैव लिंगायत समाजाच्या प्रमुख मान्यवरांची बैठक शुक्रवारी सिद्धेश्वर कारखान्याचे मार्गदर्शक तशा सिद्धेश्वर मंदिराचे विश्वस्त धर्मराज काडादी यांनी आयोजित केली होती. या बैठकीत सोलापूर लोकसभेच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांना पाठिंबा घेण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन काडादी यांनी चिमणी प्रकरणाचा उल्लेख करत आपली भूमिका स्पष्ट केली.

या बैठकीत बोलताना धर्मराज काडादी म्हणाले, आमदार प्रणिती शिंदे यांनी चिमणी पाडल्यानंतर तात्काळ साखर कारखाना स्थळावर येऊन पाहणी केली. तसेच सर्व कामगारांना यावेळी त्यांनी धीर दिला होता.



प्रणितींच्या अंगात काम करण्याची धमक आहे. आपल्या सिद्धेश्वर कारखान्याचे दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, उत्तर सोलापूर, मोहोळ अशा पाच तालुक्यांमध्ये सभासद आहेत. यावेळी मी स्वतः लक्ष घालून सर्व तालुक्यात फिरून सभासदांची एक बैठक घेणार आहे. या बैठकीत मी सभासदांना, ज्यांनी मला त्रास दिला, कारखान्याची चिमणी पाडून हजारो शेतकऱ्यांचे संसार उध्वस्त केले, अशा भाजपला चारी मुंड्या चित करा आणि प्रणिती शिंदे यांच्या पाठीशी राहा, जाहीर आवाहन करणार आहे. या प्रसंगी या बैठकीस काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे, माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, काँग्रेस नेते सुरेश हसापुरे, माजी आमदार विश्वनाथ चाकोते, बाजार समितीचे संचालक अमर पाटील, केदार उंबरजे, अशोक पाटील, माजी सभापती मल्लिकार्जुन पाटील, शिवयोगी शास्त्री हिरेमठ, सिध्दाराम चाकोते, शंकर पाटील, रामदास फताटे, अनिल सिंदगी, हरिष पाटील, विजयकुमार हत्तूरे, रमेश बावी, सकलेश बाभूळगावकर यांच्यासह सिद्धेश्वर साखर कारखाना, सिद्धेश्वर देवस्थान, सिद्धेश्वर शिक्षण संस्था, सिद्धेश्वर बाजार समिती पदाधिकारी उपस्थित होते.

# शेतकरी उठला अन पालकमंत्र्यांना विचारला जाब !

पंढरपूर – माढा लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांच्या समर्थनासाठी, टेंभुर्णी येथे सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह अनेक आमदार आणि पदाधिकारी उपस्थित होते. या सभेत अचानक काळे नावाचा शेतकरी उठला आणि , सरकारच्या शेतकरी धोरणावर बोलू लागला.कार्यकर्त्यांनी आडवा आडवीचा प्रयत्न केला, परंतु पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनीच त्याला बोलण्याची संधी दिली. हा शेतकरी असं काही बोलला की, व्यासपीठावरील सर्वच नेत्यांची बोबडी वळाली.आणि थोड्याच अवधीत ही बैठक गुंडाळावी लागली. महायुतीचे उमेदवार खा. रणजीत सिंह नाईक निंबाळकर यांची उमेदवारी जाहीर झाल्यापासूनच दमछाक सुरू आहे. मोहिते पाटील आणि रामराजे निंबाळकर यांनी पुकारलेले बंड त्यांच्या जिव्हारी लागले आहे.

# भाजपच्या फायद्यासाठीच एमआयएम मैदानात उमेदवारीला विरोध करत पदाधिकाऱ्यांचे राजीनामे

**सोलापूर** – सोलापूर लोकसभेची निवडणूक रंगतदार होताना दिसून येत आहे. सुरुवातीला युती आणि आघाडीच्या उमेदवारामध्ये ही मुख्य लढत होणार असल्याचे स्पष्ट असतानाच एमआयएम कडून उमेदवार रिंगणात उतरवण्याची तयारी सुरू केली आहे. परंतु, केवळ भाजपलाच मदत व्हावी, यासाठी एमआयएमचे शहराध्यक्ष फारुख शाब्दी आणि निरिक्षक अन्वर सादात यांनी सोलापुरातून उमेदवार देण्याचा घाट घातल्याचा आरोप एमआयएमच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी केला आहे. तसेच, पक्षाच्या या भाजपधार्जीण भूमिकेला विरोध करत आपल्या पदाचे राजीनामे सादर केले आहेत.

या पार्श्वभूमीवर बुधवारी एमआएमचे जनरल सेक्रेटरी कोमारोव्ह सय्यद, महिला अध्यक्ष रेश्मा मुल्ला, वाहतुक संघटनेचे अध्यक्ष रियाज सय्यद, दक्षिण सोलापूर अध्यक्ष तौसिफ़ काझी या पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषद घेत आपल्या पदाचे राजीनामे दिल्याचे जाहीर केले. शहरातील एमआयएम दरम्यान, एमआयएमच्या पदाधिकाऱ्यांचा या भूमिकेचा थेट फायदा काँग्रेसच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांना होणार असल्याची मत राजकीय जानकारांनी व्यक्त केले आहे.

शाब्दी आणि सादात हे मागील २०१९ च्या लोकसभा निवडणुकीचा कुठल्याही प्रकारचा सांख्यिकी अभ्यास व मतदारसंघाची जात निहाय स्थितीचा अभ्यास न करता उमेदवारी जाहीर करत आहेत. मागील लोकसभा निवडणुकीत बहुजन वंचित आघाडी व एमआयएम पक्षाची आघाडी होती. या आघाडीचे उमेदवार प्रकाश आंबेडकर होते, अशा नावाजलेल्या उमेदवारास १ लाख ७० हजार मते पडली. त्या मत विभागणीचा फायदा भाजपला झालेला होता. तर काँग्रेसचे उमेदवार सुशीलकुमार शिंदेंना पराभवाचा सामना करावा लागला होता.